**ठळक बातम्या**

- १८ व्या खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्र ऑलिम्पियाडचं मुंबईत उद्घाटन / भारतात परंपरा, नवोन्मेष, अध्यात्म, विज्ञान, औत्सुक्य आणि सर्जनशीलता हातात हात घालून चालतात, असं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- राज्यात १५ हजार पोलीस भरती करायला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी

- वादग्रस्त न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्याविरोधात महाभियोग चालवण्यासाठी लोकसभेचे सभापती ओम बिरला यांच्याकडून त्रिसदस्यीय समितीची घोषणा

- चार नवीन सेमीकंडक्टर प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

**आणि**

- पुढचा आठवडाभर कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता

**<><><><><>**

भारतात परंपरा आणि नवोन्मेष, आध्यात्मिकता आणि विज्ञान, औत्सुक्य आणि सर्जनशीलता हातात हात घालून चालतात, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. १८ व्या खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्र ऑलिम्पियाडचं औपचारिक उद्घाटन आज मुंबईत झालं. या कार्यक्रमाला प्रधानमंत्री संबोधित करत होते. भारतीय अनेक शतकांपासून  अवकाशाचं निरीक्षण करत आले आहेत. पाचव्या शतकात आर्यभट्ट यांनी शून्याचा शोध लावला, पृथ्वी ही तिच्या अक्षाभोवती फिरते हे त्यांनीच सांगितलं, याचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी आवर्जून केला. विज्ञानाच्या क्षेत्रात भारताने केलेली प्रगती आणि विविध प्रयोगाविषयी सांगत प्रधानमंत्र्यांनी कौतुक केलं. यात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचं प्रधानमंत्री मोदी यांनी स्वागत केलं.

या स्पर्धेत ६४ देशांमधून एकंदर २८८ विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

**<><><><>**

राज्याच्या पोलीस दलात सुमारे १५ हजार शिपाई भरती करायला राज्य मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. राज्यातल्या रास्त भाव दुकानदारांच्या नफ्यात वाढ करण्याचा निर्णयही मंत्रिमंडळानं घेतला. आता या दुकानदारांना प्रतिक्विंटल दीडशे ऐवजी १७० रुपये फायदा मिळेल. सोलापूर - पुणे मुंबई हवाई मार्गासाठी व्यापारी तूट भरुन काढण्यासाठी निधी देण्याचा निर्णयही आज झाला. याशिवाय, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाअंतर्गत येणाऱ्या महामंडळांतर्फे राबवण्यात येणाऱ्या विविध कर्ज योजनेतल्या जामीनदारीच्या अटी शिथिल करायला आणि शासन हमीला पाच वर्षांची मुदतवाढ द्यायलाही मंत्रिमंडळानं मंजुरी दिली.

**<><><><>**

वादग्रस्त न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांना पदावरुन हटवण्यासाठी महाभियोग चालवण्याचा प्रस्ताव आज लोकसभेत सादर झाला. सभापती ओम बिरला यांनी सांगितलं की, महाभियोग चालवण्याचे १४६ सदस्यांचे प्रस्ताव सभागृहाला मिळाले आहेत….

**- - होल्ड- बाईट- ओम बिरला - -**

न्यायमूर्ती वर्मा यांच्यावरच्या आरोपांचं गंभीर स्वरुप लक्षात घेऊन त्या प्रकरणी चौकशीसाठी तीन सदस्यांच्या समितीची घोषणा सभापतींनी केली. त्यात सर्वोच्च न्यायलयाचे न्यायमूर्ती अरविंद कुमार, मद्रास उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश महिंद्र मोहन श्रीवास्तव आणि ज्येष्ठ विधिज्ञ बी. व्ही. आचार्य यांचा समावेश आहे.

न्यायमूर्ती वर्मा दिल्ली उच्च न्यायालयात पदावर असताना त्यांच्या निवासस्थानी मोठ्या प्रमाणावर रोकड आढळल्यानंतर त्यांच्या विरुद्ध महाभियोग चालवण्याची चर्चा सुरु झाली.

<><><><><>

किरकोळ चलनफुगवट्याचा दर जुलैमधे कमी होऊन एक पूर्णांक ५५ शतांश टक्क्यांच्या नीचांकी पातळीवर पोहोचला. जून महिन्यात किरकोळ चलनफुगवट्याचा दर २ पूर्णांक १ दशांश टक्के होता. जुलैमधे ग्रामीण भागात महागाई दर १ पूर्णांक १८ शतंश टक्के होता तर शहरी भागात २ पूर्णांक ५ शतांश टक्के होता. अन्नपदार्थांच्या किमती तसंच वाहतुकीवरचा खर्च कमी झाल्यानं महागाई कमी झाली, तसंच शिक्षणावरचा खर्चही कमी झाला आहे.

<><><><><>

देशाची ६० टक्के डेटा सेंटर महाराष्ट्रात उभी राहिलेली आहेत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज नवी मुंबईत सांगितलं. ऐरोली इथं कॅपिटालॅंड च्या डाटा सेंटरचं उद्घाटन मुख्यमंत्र्यांनी केलं. त्यावेळी ते बातमीदारांशी बोलत होते. ते म्हणाले…

**होल्ड - बाईट - देवेंद्र फडनवीस**

<><><><><>

देशाच्या एकतेचं निदर्शक असलेल्या हर घर तिरंगा अभियानानिमित्त सर्वत्र विविध कार्यक्रम होत आहेत. ठिकठिकाणी तिरंगा ध्वज घेऊन पदयात्रा काढण्यात येत आहेत तसंच नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जात आहेत.

**पनवेल** महानगर पालिकेमार्फत हर घर तिरंगा’ मोहिम विविध उपक्रमांच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात राबवली जात आहे. या मोहिमेंतर्गत नुकतीच महापालिका कार्यक्षेत्रातल्या विविध शाळा महाविद्यालयांमध्ये पत्रलेखन स्पर्धा, प्रश्नमंजुषा, प्रतिज्ञा घेण्यात आली.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात सावंतवाडी इथं आज तिरंगा रॅलीचं आयोजन करण्यात आल होतं. या रॅलीत सावंतवाडी शहरातले सर्वपक्षीय पदाधिकारी, विद्यार्थी, रिक्षा संघटना, सामाजिक संघटना सहभागी झाल्या होत्या.

**नाशिक** जिल्ह्यात काढलेल्या तिरंगा रॅलीत सहभागी झालेल्या चंचल ठाकूर हिने आपलं मनोगत व्यक्त केलं

**होल्ड.. बाईट - चंचल ठाकूर**

मध्य रेल्वेच्या **सोलापूर** विभागाने आज हर घर तिरंगा मोहिमेअंतर्गत डीआरएम कार्यालय ते सोलापूर रेल्वे स्टेशनपर्यंत तिरंगा यात्रा आयोजित केली.

**लातूर** महानगर पालिकेतर्फे लातूर शहरात मोटार सायकल रॅली काढण्यात आली.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्रिमंडळानं आज ओदिशा, पंजाब आणि आंध्र प्रदेशातल्या ४ हजार ५९४ कोटी रुपयांच्या चार नवीन सेमीकंडक्टर प्रकल्पांना मंजुरी दिली. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बातमीदारांना ही माहिती दिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आजच्या बैठकीत मंत्रिमंडळानं हा निर्णय घेतला.

लखनऊ मेट्रो फेज-१बी प्रकल्पालाही मंत्रिमंडळाने आज मंजुरी दिली. या प्रकल्पासाठी  ५ हजार ८०१ कोटी रुपयांहून अधिक खर्च अपेक्षित आहे. अरुणाचल प्रदेशातल्या शि योमी जिल्ह्यात उभारण्यात येणाऱ्या तातो-२ जलविद्युत प्रकल्पाही मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. ७०० मेगावॅट क्षमतेच्या या प्रकल्पामुळे अरुणाचल प्रदेशाच्या विकासाला चालना मिळणार आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या ६० साखरकारखान्यांनी ऊसउत्पादकांची सुमारे ३८७ कोटी रुपयांची देणी थकवली आहेत. आगामी गाळप हंगाम जवळ आला असताना गेल्या

हंगामातली ही रक्कम शेतकऱ्यांना अद्याप मिळालेली नाही. सोलापूर जिल्ह्यातल्या ९ कारखान्यांनी अद्याप सुमारे एफआरपी चे ८१ कोटी रुपये थकवले असून ही संख्या सर्वाधिक आहे.त्याखालोखाल अहिल्यानगर आणि कोल्हापूर जिल्ह्याचा क्रमांक लागतो, असं साखर आयुक्तालयाच्या पत्रकाचा हवाला देऊन हिंदुस्तान समाचार या वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर विभागाने मॅजिक गोल्ड बुलियन या कंपनीविरोधात केलेल्या कारवाईत कंपनीचा संचालक यशवंत कुमार टेलर याला अटक केली आहे. टेलर याने ३० कोटी ५१ लाख रुपयांच्या महसुलात अफरातफर केल्याचा आरोप आहे. वस्तुंचा प्रत्यक्ष पुरवठा न करता बिलं जारी करणाऱ्या पुरवठादारांकडून चुकीच्या पद्धतीने इनपुट टॅक्स क्रेडिट मिळवणं किंवा वापरणं अशा कारवायांमध्ये टेलर याचा सहभाग असल्याचं आढळलं आहे. टेलर याला मुंबईच्या अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांनी १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी दिली आहे.

**<><><><><>**

युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळात अलीकडेच समावेश झालेल्या, सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या ऐतिहासिक विजयदुर्ग किल्ल्याच्या व्यंकट बुरुजाची समुद्रातली खालची बाजू लाटांच्या माऱ्यानं ढासळली आहे. समुद्रात मासेमारीसाठी जाणाऱ्या स्थानिकांच्या निदर्शनाला ही बाब आली. ही माहिती पुरातत्त्व विभागाला देण्यात आली आहे. बुरुजाच्या पायाकडचा सुमारे दोन मीटर उंच आणि सुमारे १५ फूट रुंद भाग लाटांच्या माऱ्यामुळे ढासळला असून असून तिथल्या तटबंदीला मोठं भगदाड पडल आहे. या तटाची लवकरात लवकर डागडुजी करावी, अशी मागणी शिवप्रेमींनी केली आहे.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या मुख्य प्रवक्त्यांची नावं आज जाहीर करण्यात आली. त्यात माजी मंत्री जितेंद्र आव्हाड, विद्या चव्हाण, अंकुश काकडे, महेश तपासे, यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

पुढचा आठवडाभर कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. या काळात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातही अनेक ठिकाणी पाऊस पडेल, तर तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**